महाराष्ट्र पोलीस

## गोंदिया जिल्हा पोलीस वार्तापत्र

दिनांक:- २४/०७/२०१८

### १) पो.स्टे.तिरोडा:-फुस लावुन पळवुन नेणे

दिनांक ०६/०७/२०१८ चे १०.०० वा. सुमारास मौजा करटी येथील ४० वर्षीय फिर्यादी चे १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला २२ वर्षीय आरोपीने फुस लावुन फिर्यादीचे कायदेशिर रखवालीतुन पळवुन नेल्याने फिर्यादीच्या तक्रारीवरुन पो.स्टे. तिरोडा योथे अप.क्र. २८६/२०१८ कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास स.फौ. बागडे पो.स्टे. तिरोडा करीत आहे.

### २) पो.स्टे.गोंदिया ग्रामीण :-चोरी

दिनांक २२/०७/०१८ चे २१.०० वा. ते २३/०७/२०१८ चे ०९.०० वा. सुमारास मौजा बम्लेश्वरी कॉलोनी आंबाटोली गोंदिया येथे फिर्यादी शरद विजयपाल अग्रवाल रा. गोंदिया यांचे भाऊ नातेवाईकांकडे लग्न कार्यक्रम असल्यामुळे हरियाणा येथे परिवारासह गेले असता सुना मौका पाहुन आरोपीने फिर्यादीच्या राहत्या घराचे समोरील दरवाज्याचा कुंदा तोडुन घरात प्रवेश करुन बेडरुम मध्ये ठेवलेल्या लाकडी आलमारीचा ताला तोडुन ठेवलेली नगदी २०,०००/-रुपये व चांदीची भांडी किंमती १०,०००/-रुपये असा एकुण ३०,०००/-रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन पो.स्टे. गोंदिया ग्रामीण येथे अप.क्र. २७६/०१८ कलम ४५७, ३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला सदर गुन्हयाचा तपास पो.हवा. गजपुरे पो.स्टे.गोंदिया ग्रामीण करीत आहे.

### ३) पो.स्टे.गोंदिया शहर :-जबरी चोरी

दिनांक २२/०७/२०१८ चे १९.१५ वा. सुमारास रेल्वे स्टेशन समोर गोंदिया येथे फिर्यादी नामे सौरभ ऊर्फ मोंटी मनोजसिंग चौव्हाण वय ३१ वर्षे रा. गौशाला वार्ड गोंदिया हे घरी जात असता आरोपीतांनी संगनमत करुन मयुर पानठेल्याजवळ त्यास अडवुन दारु पिण्यास पैसे मागुन पैसे न दिल्याने लाठी व काठीने मारपीट करुन, ओठावर मारुन जख्मी करुन जबरदस्तीने खिशातुन ९००/-रुपये काढुन नेल्याने व फिर्यादीच्या तक्रारीवरुन अप क्र. ३३६/०१८ कलम ३९४,३४ भांदवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सपोनि सावंत पो. स्टे. गोंदिया शहर करीत आहे.

### ४) पो.स्टे गोंदिया शहर :-चोरी

दिनांक २१/०७/२०१८ चे २३.०० वा. ते २२/०७/२०१८ चे ०४.३० वा. दरम्यान मौजा होटल प्रिमीयर पोलीस स्टेशन समोर गोंदिया येथे फिर्यादी बबन सुका शहारे वय-६० वर्ष यांच्या होटल प्रिमीयर मधील गल्यातील १४,००/- रुपये, लॉकरमधील २,०००/-रु., सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमती ५००/-रु. व अंकीत ठाकुर यांचे रुममधील बॅगमध्ये ठेवलेले १,०००/-रुपये, पॅनोसोनिक कंपनीचा मोबाईल किंमती ८,०००/-रुपये असा एकुण १२,९००/-रुपयाचा माल यातील २५ वर्षीय आरोपीने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तक्रारीवरुन पो.स्टे.गांदिया शहर येथे अप.क्र. ३३७/२०१८ कलम ४५७,३८० भांदवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहवा. चौधरी पो. स्टे. गोंदिया शहर करीत आहे.

(आर.बी.मेढे)
पोलीस निरिक्षक
जिल्हा विशेष शाखा,गोंदिया